An ISO 9001:2008 Certified Institute
डंबेलकर्स
SPOKEN ENGLISH CLASSES
इंग्रेजी शिकणे आहे ? प्रवेश सुरु
MONEY BACK GUARANTEE*
Jr KG,बालवाडी पासुन ते सर्व वयापर्यंत
ABCD पासुन शिकवण्यात येईल ☛ ऑनलाईन/ऑफलाईन बॅचेस
☛ शाळेत गेले नाहीत त्यांना मराठी,हिन्दी सुध्दा शिकवण्यात येईल
"एकदा फी भरली कि जीवन भर क्लासेस मोफत"
जळगांव,भुसावळ,धुळे,शिरपुर,मो. 9325562488

शिल्पकार विकासाचा...
देशदूत

मुळव्याध, फिशर, भगंदर
इंजेक्शन व लेझरद्वारे उपचार
✔ संडासद्वारे रक्त पडणे व कोंब येणे
✔ गुदमार्गाच्या ठिकाणी खाज, सुज आग व वेदना होणे
✔ गुदमार्ग लहाण होणे ✔ गुदद्वाराजवळ सेप्टीक होणे
✔ माकड हाडाजवळ, खाज, गाठ किंवा पु होणे
कॅशलेस व मेडिक्लेम सुविधा उपलब्ध.
कृपया येतांना अपॉईंमेंट घेऊन येणे...
डॉ.मनोज पाटील
M.S. [Shalya] | F.A.R.C.S. | जनरल सर्जन व गुदविकार तज्ज्ञ
लोढा हॉस्पीटल, जिल्हा बँकेजवळ, रिंग रोड, जळगांव. 70302 33533

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २८ । अंक २९३ । गुरुवार, दि.१४ ऑगस्ट २०२५ । पाने-८+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

संपादकीय

आयोगाला बोलू द्या...

केंद्रीय निवडणूक आयोग सध्या चर्चेत आहे. संसदेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांमुळे देशात घमासान सुरु आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने भारतीय जनता पक्षाशी संगनमत करून लोकसभा निवडणूक निकालांमध्ये फेरफार केल्याचा त्यांचा आरोप आहे. पत्रकार परिषदेत त्यांनी त्याच्या समर्थनार्थ पुरावे सादर केले. यावर 'इंडिया' आघाडीने काढलेला मोर्चा देखील गाजला. विविध मोर्चाच्या बाबतीत एरवी जे घडते तेच घडले. पोलिसांनी मोर्चा अडवला. अडथळे उभारले. आंदोलकांनी ते ओलांडून जाण्याचा प्रयत्न केला. त्यांना अटक करण्यात आली. अटकेची दृश्ये समाजमाध्यमांवर फिरली नसती तरच नवल. याची आयोगाभोवतीचे संशयाचे धुके दाट होण्यास मदतच झाली. तसेही समाजमाध्यमांवरही आरोपाच्या बाजूने आणि विरोधात जोरदार मतप्रदर्शन सुरु आहे. निदान या मुद्यावर तरी 'इंडिया' आघाडीत एकमत आढळते. त्यांचे नेते राहुल गांधींबरोबर उभे आहेत. भारतीय जनता पक्षाचे नेते विरोधात बौद्धिक घेत आहेत. तशीही राजकारणात बोलघेवड्यांनी पातळी सोडली आहे. त्यामुळे लोकही आता नेत्यांकडून सभ्य बोलण्याची अपेक्षा ठेवत नाहीत. या मुद्यावरून परस्परांचे प्रतिमा हनन होणार, वादविवाद रंगणारच. पण या सगळ्या गदारोळात निवडणूक आयोग मात्र गप्प का हा खरा प्रश्न आहे. आयोगाकडून तातडीने प्रतिसाद जनतेला अपेक्षित होता तो अजूनही मिळालेला नाही. निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था आहे. तिची विश्वासार्हता पणाला लागली आहे. विविध स्वायत्त संस्था अधूनमधून वादाच्या भोवऱ्यात सापडतात. सक्तवसुली संचालनालयावर तर सर्वोच्च न्यायालयाने गंभीर टीकाटिप्पणी केली आहे. ईडीने सर्व मर्यादांचा भंग केला अशा शब्दात सुनावले आहे. देशातील स्वायत्त संस्था कणाहीन झाल्या किंवा तसे आरोप त्यांच्यावर होऊ लागले तर लोकशाही बळकट कोण करणार? ती सार्थ कोण ठरवणार? राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर कोणते आरोप केले ते माध्यमात प्रसिद्ध झाले आहेत. निवडणुकीचे वेळापत्रक ठरवून नियंत्रित पान २ वर

प्रेयसीवर झाडल्या गोळ्या; चार-पाच मुलींना संपवण्याची भाषा; गुंडाची पोलिसांनी धिंड काढत उतरवला माज

संभाजीनगर । पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये एका कुख्यात गुंडाचा माज चांगलाच उतरवला आहे. प्रेयसीला गोळ्या झाडून या गुंडाने दहशत माजवण्याचा प्रयत्न केला होता. तसेच त्याने पोलिसांसमोर मोठी धमकी दिली होती. जेलमधून सुटल्यावर आणखी चार-पाच मुलींना मारणार, अशी धमकी त्याने पोलिसांसमोर दिली होती. त्यामुळे त्याची किती हिंमत वाढली आहे, याबाबत सर्वत्र चर्चा सुरु होती. अखेर पोलिसांनी या गुन्हेगाराचे मुंडन केले आणि त्याची रस्त्यावर धींड काढली. पोलिसांनी या माध्यमातून त्याचा चांगलाच माज उतवला आहे.

हर्सूल कारागृहातून सुटतात कुख्यात गुंडाने प्रेयसीवर गोळीबार केला. यात प्रेयसी जखमी झाली आहे. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अटक केल्यानंतर या गुंडाने पोलिसांसमोर धमकी दिली. जेलमधून सुटल्यानंतर आणखी चार-पाच मुलींना मारायचे आहे, असे तो म्हणत होता. दहशत माजवणाऱ्या या गुंडाची छत्रपती संभाजीनगरच्या पोलिसांनी त्याची दहशत असलेल्या किलेअर्क, बुडीलेन, कॅनॉट येथून धिंड काढत चांगलाच माज उतरवला. सय्यद फैजल (उर्फ तेजा) सय्यद एजाज असे गोळीबार केलेल्या कुख्यात गुन्हेगाराचे नाव आहे. तो किलेअर्क इथला रहिवासी आहे.

सय्यद फैजल उर्फ तेजा हा शहरातील कुख्यात गुन्हेगार आहे. त्याच्यावर बलात्कार, शस्त्रसाठा, ड्रग्स तस्करी यासारखे १५ पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. तो नुकताच हर्सूल कारागृहातून बाहेर आला आहे. दरम्यान सोमवार रात्री आठ वाजेच्या सुमारास तेजा हा बेगमपुरा परिसरात होता.

माझ्या जीवाला धोका!

राहुल गांधींचा न्यायालयात दावा

पुणे । स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत केलेल्या विधानांमुळे सध्या मानहानीच्या खटल्याचा सामना करत असलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी कोर्टामध्ये एक खळबळजनक दावा केला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर मानहानी प्रकरणी सुरू असलेल्या खटल्याच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील एका कोर्टात निवेदन देत राहुल गांधी यांनी आपल्या जीवितास धोका असल्याचे म्हटले आहे. यामध्ये महात्मा गांधी यांच्या झालेल्या हत्येचा उल्लेख करत राहुल गांधी यांनी इतिहासाला त्याची पुनरावृत्ती करण्याची संधी मिळता कामा नये, असेही या निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनामध्ये राहुल गांधी म्हणाले की, हल्लीच्या काळात मी ज्या राजकीय मुद्द्यांबाबत आवाज उठवला आहे. तसेच याआधी स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबत ज्या टिप्पण्या केल्या आहेत. त्यामुळे माझ्या सुरक्षेला असलेला धोका वाढला आहे. या खटल्यातील तक्रारदार हे नथुराम गोडसे यांचे थेट वंशज आहेत. तक्रारदाराच्या कुटुंबाची

हिंसा आणि असंवैधानिक कृत्यांशी संबंधित कारवायांचा इतिहास कागदपत्रांमधून उपलब्ध आहे.

राहुल गांधी यांनी पुढे सांगितले की, मला हानी पोहोचवली जाऊ शकते, अशी मला स्पष्ट आणि तार्किक शंका आहे. मला खोट्या प्रकरणात अडकवले जाऊ शकते किवा अन्य मार्गांनी लक्ष्य केले जाऊ शकते. तक्रारदाराच्या कुटुंबाला हिंसाचाराची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे इतिहासाला त्याची पुनरावृत्ती करण्याची परवानगी मिळता कामा नये, असे राहुल गांधी यांना महात्मा गांधी यांच्या हत्येचा संदर्भ देत सांगितले.

मी केलेल्या मत चोरीच्या आरोपांमुळे माझे राजकीय विरोधक संतप्त झाले आहेत. भाजपाकडून मला दोन वेळा सार्वजनिकरीत्या धमक्या मिळाल्या आहेत. यामध्ये केंद्रीय मंत्री रवनीत सिंग बिट्टू यांनी मला देशातील पहिल्या क्रमांकाचा दहशतवादी म्हटले आहे. तर भाजपा नेते तरविंदर सिंह मारवाह यांनीही मला धमकी दिली आहे, असा दावा राहुल गांधी यांनी केला. तसेच खरोखरच धोका असल्याने आपल्या सुरक्षेच्या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करण्यात यावा, अशी विनंती त्यांनी न्यायालयाला केली.



राजस्थानच्या दौसामध्ये ११ भाविकांवर काळाचा घाला

दौसा । पिकअप कार आणि ट्रकचा भीषण अपघातात ११ भाविकांचा मृत्यू झाला असून १४ जण जखमी झाले आहेत. ९ जणांची प्रकृती गंभीर आहे. मृतांमध्ये सात लहान मुलं आणि दोन महिलांचा समावेश आहे. ते मंदिरात दर्शन घेऊन परतत होते. त्यावेळी हा भयानक अपघात झाला. राजस्थानच्या दौसामध्ये हा भीषण अपघात घडला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सर्व भाविक पिकअप व्हॅनमध्ये होते. या पिकअप व्हॅनवस ट्रकची टक्कर झाली. गंभीर जखमींना जयपूरच्या सवाई मानसिंह रुग्णालयात हलवण्यात आले आहे. अन्य जखमींवर दुसऱ्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सर्व भाविक उत्तर प्रदेशचे रहिवासी असल्याची माहिती आहे. खाटू श्याम जी आणि सालासर बालाजीच दर्शन करुन हे भाविक परतीच्या मार्गावर असताना काळाने त्यांच्यावर घाला घातला.

भाजपाविरुध्द भाजपाच्या लढतीत शाहांना धक्का

राजीव प्रताप रुडींनी केला बालियान यांचा पराभव

नवी दिल्ली । दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशनल क्लब ऑफ इंडियाच्या सचिवपदी भाजपा खासदार राजीव प्रताप रुडी यांची निवड झाली आहे. त्यांनी भाजपाचेच माजी केंद्रीय मंत्री संजीव बालियान यांचा पराभव करत विजय मिळवला. या निवडणुकीत अमित शहा, सोनिया गांधी यांच्यासह अनेक दिग्गजांनी मतदानाचा हक्क बजावला होता.रुडी यांनी त्यांच्याच पक्षाचे माजी खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री डॉ. संजीव बालियान यांचा १०० पेक्षा अधिक मतांनी पराभव केला.

१२ ऑगस्टला झालेल्या निवडणुकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा , काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्यासह अनेक दिग्गजांनी मतदान केले होते. या निवडणुकीत आजी, माजी खासदारांनी मतदान केले होते. बालियान हे अमित शहांचे उमेदवार मानले जात होते. भाजपच्या बहुतांश खासदारांनी बालियान यांनाच मतदान केले होते. पण काँग्रेससह अन्य पक्षांनी रुडी यांनी भरभरुन पाठिंबा दिला.

काँग्रेसने मारले एकाच दगडात दोन पक्षी

☛ विरोधकांनी रुडी यांना साथ देत एकाच दगडात दोन पक्षी मारले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्वत: रुडी यांच्यासाठी पुढाकार घेतल्याची चर्चा दिल्लीत आहे. काही दिवसांपूर्वीचा संसद भवन परिसरातील व्हिडीओ आता व्हायरल झाला आहे. त्यातून अनेक गोष्टींचे संकेत मिळतात. त्यावेळी माध्यमांशी संवाद साधण्याआधी रुडी यांना राहुल गांधी भेटले. दोघांनी हसत हसत हस्तांदोलन केले होते. भाजप खासदाराने भाजपच्या अधिकृत उमेदवाराचा केलेला पराभव याकडे भाजप अंतर्गत कलह या दृष्टीनंदेखील पाहिले जात आहे.

पायलट असलेले, सर्वाधिक तास विमान चालवण्याचा विक्रम नावावर असलेले रुडी यांनी ऐतिहासिक निवडणूक जिंकण्यासाठी डोअर टू डोअर प्रचार केला.

सर्वोच्च न्यायालयाचा विरोधकांना धक्का

नवी दिल्ली । सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी बिहारमधील मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती प्रक्रियेला योग्य ठरवत विरोधकांना मोठा धक्का दिला आहे.बिहार व पश्चिम बंगालमध्ये याच मुद्यावरून आंदोलन सुरु असून दिल्लीत देखील विरोधकांनी सरकारला धारेवर धरले आहे. त्यामुळे न्यायालयाच्या या निर्णयामुळे विरोधकांना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. न्यायालयाने म्हटले की या प्रक्रियेत, ओळखीसाठी वैध कागदपत्रांची संख्या ७ वरून ११ करण्यात आली आहे, ज्यामुळे मतदारांना अधिक पर्याय मिळतात. आधारशी संबंधित आक्षेप न्यायालयाने फेटाळून लावले याचिकाकर्त्यांकडून बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी निवडणूक आयोगावर नागरिकत्वाच्या पुराव्याच्या मुद्द्यावर आपली भूमिका बदलल्याचा आरोप केला.

निर्णय तुमचा; आमच्या मस्तकी का मारता?

'त्या' निर्णयाचे फडणवीसांनी तारखेसह वर्षही सांगितले

मुंबई । १५ ऑगस्ट म्हणजे स्वातत्र्य दिनाच्या दिवशी राज्यातील अनेक महापालिकांनी मांस विक्री बंद ठेवण्याच्या निर्णय घेतला आहे, यावर फडणवीस यांनी म्हटले की, राज्य सरकारने कुठलाही असा निर्णय घेतलेला नाही. हा निर्णय १२ मे १९८८ रोजी तत्कालीन काँग्रेस सरकारने घेतला होता आणि त्यानंतर तो लागू झाला आहे. या निर्णयानुसार प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, गांधी जयंती, रामनवमी, महावीर जयंती या दिवशी कत्तलखाने बंद ठेवण्याचा अधिकार महापालिकेला देण्यात आला आहे. यापूर्वी महाविकास आघाडी सरकारच्या काळातही कत्तलखाने आणि मांसाहार विक्री दुकाने बंदचा निर्णय घेण्यात आला होता. राज्यभरात वादंग पेटल्यानंतर सरकारमधीलच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील यावर नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे फडणवीसांना याची दखल घ्यावी लागली.

१५ ऑगस्ट म्हणजे स्वातत्र्य दिनाच्या दिवशी राज्यातील अनेक महापालिकांनी मांस विक्री बंद ठेवण्याच्या निर्णय घेतला आहे, यावरून आता राज्यात वातावरण चांगलंच तापले आहे. विरोधी पक्षांकडून या निर्णयाचा जोरदार विरोध होत असून, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या मुद्द्यावरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे, या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची खुलासा केला आहे.

वादाचा विषय नाही; समाजाचा विषय !

☛ मुंबईतील कबुतरखाने तुर्तास बंद ठेवण्याचे आदेश न्यायालयाकडून देण्यात आले आहेत. मात्र यावर जैन समाजाने आक्रमक भूमिका घेतली आहे. कबुतरखान्यावरून राज्याच्या राजधानीमध्ये वातावरण चांगलंच तापलं आहे. यावर देखील आता देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. लोकांचे आरोग्य महत्त्वाचे आहे, आस्थेचा विषय आहे, त्यांची काळजी घेवू शकतो. वस्ती नाही तिथे आपण खाद्याची व्यवस्था करू शकतो. वादाचा विषय नाही समाजाचा विषय आहे. समाजाचे आरोग्य आणि समाजाची आस्था हे दोन्ही विषय आम्ही सोडवू, एका समाजाविरोधात दुसरा समाज उभा केला जात आहे, मुंबई महापालिका निवडणुकीमुळे असं काही जण करण्याचा प्रयत्न करत आहेत, अस यावेळी फडणवीस यांनी म्हटलं आहे.

केळी भाव

नवती (१) : 1925
नवती (२) : 1725

मिस्किली

खाद्यतेलाच्या टँकरमधून पुष्पा स्टाईल दारुची तस्करी

मुंबई-आग्रा महामार्गावर नाकाबंदीदरम्यान धुळे पोलिसांनी जप्त केला १ कोटीचा मुद्देमाल

धुळे । येथील स्थानिक गुन्हे शाखा व नरडाणा पोलिसांच्या संयुक्त कारवाईत खाद्य तेलाच्या टँकरमधून पुष्पा स्टाईल होणारी अवैध विदेशी दारूची तस्करी उघड झाली. यात तब्बल ५५ लाख ९६ हजार रुपये किमतीच्या ४०० बॉक्समधील ३ हजार ६०० लिटर विदेशी दारू आणि ४५ लाख रुपये किमतीचा टँकर असा एकूण १ कोटी ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हरियाणा येथून गुजरात राज्यात या विदेशी तस्करी होत होती.

दि.१२ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, मुंबई-आग्रा महामार्गावर आकांक्षा हॉटेलजवळ नाकाबंदी दरम्यान टँकर (क्र. जीजे -१२ बीव्ही ५०१५)

अडवण्यात आला. फक्त खाद्य तेल असे लिहिलेल्या या टँकरमध्ये लोखंडी पत्र्याने तयार केलेल्या सहा कप्प्यांपैकी चार कप्प्यांत ऑल सीझन, रॉयल चॅलेंज गोल्ड, रॉयल स्टॅग या ब्रँडची विदेशी दारू आढळून आली. आरोपी चालकाने खाद्य तेल वाहतूक असल्याचे सांगून फसवणूक करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तपासात टँकर हरियाणाहून धुळे मार्गे गुजरातला निघाल्याचे उघड झाले. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, दारूचा स्रोत व विक्रीसाठीचा गंतव्य ठिकाण शोधण्याचे काम सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी चे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, नरडाणा पोलीस ठाण्याचे सपोनि. निलेश मोरे, एलसीबीचे पोउनि. चेतन मुंडे, पोलीस अंमलदार पवन गवळी, आरीफ पठाण, देवेंद्र ठाकुर, राहुल सानप, मयुर पाटील तसेच नरडाणा पोलीस ठाणेचे अंमलदार रविंद्र मोराणीस, ललित पाटील, राकेश शिरसाठ, योगेश गिते व मोरे यांच्या पथकाने केली.

www.zalimlotion.in
जालिम लोशन®
ZALIM LOTION
For Ringworm and Itches
दाद, खाज, खुजली तथा एक्जिमा साठी उपयोगी
ANIL PUB.
मेडिकलमधून आजच विकत घ्या.
12D/75/4127/09/25/267
E-mail for Dealership at zalimlotion1929@gmail.com